



दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८१ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । शुक्रवार । ०३/०४/२०२६ । पान - ६








# तमाशा कलावंतांवर जमावाचा प्राणघातक हल्ला

## महिला कलावंतांचा विनयभंग, चौघांना अटक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पठार भागात एका किरकोळ कारणावरून संतापजनक आणि धक्कादायक प्रकार घडला असून, राष्ट्रपती सुवर्णपदक विजेत्या दिवंगत विठाबाई नारायणगावकर यांच्या तमाशा फडातील कलावंतांवर ५० ते ६० जणांच्या जमावाने प्राणघातक हल्ला केल्याची घटना उघडकीस आली आहे. या अमानुष हल्ल्यात महिला कलाकारांनाही बेदम मारहाण करून त्यांचा विनयभंग करण्यात आला असून कलावंतांकडील रोकडही लुटण्यात आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण राज्यातील लोककलावंतांमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली आहे. या घटनेचा सर्वत्र निषेध झाल्यानंतर घारगाव पोलीसांनी कारवाई करत सुमित शांताराम गुंजाळ, संकेत शांताराम बांगर, सोमेश सुखदेव बोंबले, दत्तात्रय रावसाहेब पडवळ या चार जणांना अटक केली आहे. तर ४० पेक्षा अधिक जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना बुधवारी (दि.१) दुपारी सुमारे दोनच्या सुमारास नाशिक-पुणे महामार्गावरील वरुडी पठार शिवारात घडली. संबंधित तमाशा फड हा पोखरी बाळेश्वर (ता. संगमनेर) येथील कार्यक्रम आटोपून पुढील कार्यक्रमासाठी माळेगाव पठारच्या दिशेने जात होता. दरम्यान, वरुडी पठार येथील पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी वाहने थांबली असता एका दुचाकीस्वाराने तमाशाच्या वाहनाला कट मारला. या क्षुल्लक कारणावरून वाद निर्माण झाला आणि काही क्षणांतच परिस्थिती तणावपूर्ण बनली.

वाद वाढताच संबंधित दुचाकीस्वाराने आपल्या साथीदारांना घटनास्थळी बोलावून घेतले. अवघ्या काही मिनिटांत ५० ते ६० जणांचा मोठा जमाव तेथे जमा झाला. या जमावाने तमाशा फडातील कलावंतांना लक्ष्य करत लाठी-काठ्या व हातांनी बेदम मारहाण केली. महिला कलाकारांनाही निर्दयपणे मारहाण करत त्यांच्या अंगावरील कपडे फाडून त्यांचा विनयभंग करण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या दरम्यान कलावंतांकडील रोकड व मौल्यवान वस्तूही (पान ३ वर)

## तमाशा कलावंतांवरचा भ्याड हल्ला समाजाच्या विवेकाला प्रश्न !

तमाशा महाराष्ट्राची ओळख आपल्या मातीचा अभिमान. पण या कलेच्या मागे उभे असलेले कलावंत मात्र आजही असुरक्षित उपेक्षित आणि संघर्षमय जीवन जगत आहेत ही कटू वस्तुस्थिती आहे. गावोगावी यात्रा सुरू आहेत. हेच ते दिवस, जेव्हा तमाशा फड मालक आणि कलाकार सकाळ-संध्याकाळ कार्यक्रम करून आपल्या कुटुंबासाठी दोन वेळच्या भाकरीची सोय करतात. पण या प्रवासात त्यांना सन्मान नाही, तर भीती आणि अपमानच जास्त मिळतो. आजच्या घटनेत पेट्रोल पंपावर गाड्या डिझेल भरत असताना काही समाजकंटकांनी गाडी आडवी लावून तमाशा फडातील मुलींची छेडछाड केली. ड्रायव्हरने शांततेने समजावण्याचा प्रयत्न केला पण उत्तर मिळालं ते भ्याडपणाचं हल्ल्याच्या रूपाने! हे केवळ एका घटनेपुरतं मर्यादित नाही असे जीवघेणे प्रसंग अनेक तमाशा फड मालक आणि कलाकारांवर वेळोवेळी येत आहेत. दुसऱ्या गावात जाऊन पोट भरणाऱ्या या गरीब कलावंतांना तिथल्याच काही गावगुंडांकडून त्रास सहन करावा लागतो ही आपल्या समाजासाठी लाजिरवाणी बाब आहे. प्रश्न केवळ सुरक्षेचा नाही, तर सन्मानाचाही आहे! ज्यांच्या कलेवर आपण टाळ्या वाजवतो, त्यांच्याच सुरक्षिततेकडे आपण दुर्लक्ष करतो हे किती विरोधाभासी आहे? प्रत्येक गावातील ग्रामस्थ, यात्रा कमिटी आणि प्रशासनाने एकत्र येऊन तमाशा फड आणि कलाकारांना ठोस सुरक्षा द्यावी अशा समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी कारण कलावंत सुरक्षित असेल, तरच कला टिकेल आणि कला टिकली, तरच संस्कृती जिवंत राहील!

तीव्र निषेध!

– मंगला बनसोडे व नितीन कुमार करवडीकर, तमाशा मालक

# ताराराणी जैन होत्या

## जैन मुनींच्या वक्तव्याने नवा वाद




मुंबई (वृत्तसंस्था)

जैन मुनी आचार्य नयन पद्मसागर यांच्या एका वक्तव्याने वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. महाराणी ताराराणी या जैन समूदायच्या असल्याचं वादग्रस्त वक्तव्य त्यांनी केलं. औरंगजेबचा नाश करण्यासाठी जैन महाराणी असलेल्या ताराराणींचा जन्म झाला असं वक्तव्य आचार्य नयन पद्मसागर यांनी केलं. मुंबईतील जैन समूदायाच्या एका कार्यक्रमात त्यांनी हे वक्तव्य केलं. त्यांच्या या वक्तव्यावरुन आता सामाजिक आणि राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. जैन समूदायाच्या कार्यक्रमात बोलताना आचार्य नयन पद्मसागर म्हणाले की, मोहम्मद घोरीने देशावर आक्रमण केलं त्यावेळी जैन असलेल्या मेवाड राणीने आपली तलवार काढली. त्यानंतर पुढील अनेक वर्षे आपल्या देशावर कोणी नजर वर करून बघायची हिंमत केली नाही . संस्कार आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी हातात तलवार घेणे याला धर्म म्हणतात. विक्रमादित्यने पूर्ण भारताला स्वतंत्र करण्यात मदत केली. औरंगजेब याने संभाजी महाराजांना पकडून हाल केले. त्यावेळी आणखी एक जैन महाराणीचा जन्म झाला आणि ती म्हणजे ताराराणी. छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराराणी यांनी २५ वर्षे औरंगजेबशी लढा दिला आणि त्याला जेरीस आणलं. (पान ५)

## ॲसिड हल्ल्यातील आरोपीसाठी पोलीसांकडून दोन लाखांचे बक्षिस



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे सहावीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर झालेल्या भीषण ॲसिड हल्ल्याला १५ दिवस उलटूनही मुख्य आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. या घटनेमुळे जिल्ह्यात संतापाची लाट असून, तपास यंत्रणेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर, आरोपीची माहिती देणाऱ्या व्यक्तीस अहिल्यानगर पोलिसांनी २ लाख रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले असून माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णतः गुप्त ठेवले जाणार आहे.

पंधरा दिवसांपूर्वी शाळेतून घरी परतत असताना एका अज्ञात इसमाने या मुलीवर अचानक ॲसिड फेकून पलायन केले होते. या हल्ल्यात गंभीर भाजलेल्या मुलीवर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेचे गांभीर्य ओळखून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. दरम्यान, घटनास्थळी सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने आणि कोणताही प्रत्यक्षदर्शी पुरावा उपलब्ध नसल्याने तपासात अडथळे येत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने पीडित मुलीने सांगितलेल्या वर्णनावरून संशयित आरोपीचे रेखाचित्र (स्केच) प्रसिद्ध केले असून ते सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आले आहे. पोलिसांनी आतापर्यंत अनेक संशयितांची चौकशी केली असून, तपास पथके दिवसरात्र काम करत आहेत. नागरिकांना या रेखाचित्रातील व्यक्तीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या ९८२३२५६९४९ किंवा ८२०८४४६२९३ या क्रमांकावर तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# हनुमान जयंती परंपरेचा सोहळा उत्साहात







संगमनेर – शहरात सालाबादप्रमाणे हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने गेल्या अनेक वर्षांची परंपरा असलेल्या मारूतीरायाचा रथ ओढण्याचा मान महिलांना असतो त्याप्रमाणे हा रथ महिलांनी ओढला. हा रथ फुलांनी सजवून त्यावर शहर पोलीस यांच्या वतीने पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांचे हस्ते ध्वज लावण्यात आला. याप्रसंगी आमदार अमोल खताळ, सौ. निलमताई खताळ, नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्री थोरात, नगरसेविका यांच्यासह अनेक मान्यवर व महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परंपरेनुसार रथाची मिरवणूक चंद्रशेखर चौक, रंगार गल्ली, कॅप्टन लक्ष्मीचौक, लालबहादूर शास्त्री चौक, नगरपालीका, चावडी चौक, बाजारपेठ, तेलीखुंट, नेहरूचौक व पुन्हा चंद्रशेखर चौक अशी मोठ्या उत्साहात पार पडली. (सविस्तर बातमी पान ३ वर)









# जालनामध्ये काँग्रेसकडून मोठी कारवाई - ७ नगरसेवक निलंबित



जालना (वृत्तसंस्था)

भाजपला मदत केल्याच्या आरोपावरून जालना महानगरपालिकेतून काँग्रेसच्या सात नगरसेवकांना निलंबित करण्यात आले आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी गैरशिस्तीविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणातील शिस्त आणि सचोटीबाबत काँग्रेसने एक मोठे आणि कठोर पाऊल उचलले आहे. पक्षविरोधी कारवाया आणि जालना महानगरपालिकेत भाजपसोबत संगनमत केल्याच्या आरोपावरून काँग्रेसने आपल्या ७ नगरसेवकांना तात्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे (एमपीसीसी) अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार उचललेल्या या कारवाईमुळे स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे. पक्षाच्या सूत्रांनुसार, या नगरसेवकांनी महानगरपालिकेतील महत्त्वाच्या नियुक्त्या करताना पक्षादेशाचे उल्लंघन करून भाजप उमेदवारांना उघडपणे मदत केली होती.ही कारवाई अशा वेळी झाली आहे, जेव्हा काँग्रेस राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांवरील आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे. यापूर्वी पक्षाने अंबरनाथ महानगरपालिकेतही अशीच कठोर भूमिका घेतली होती.

चौकशी अहवालातून धक्कादायक खुलासा झाला की, जालना महानगरपालिकेच्या सह-सदस्य नियुक्ती प्रक्रियेदरम्यान या सात नगरसेवकांनी पक्षाची धोरणे आणि तत्त्वे पूर्णपणे धुडकावून लावली. राज्य नेतृत्वाने जारी केलेला शासकीय व्हीप धुडकावून लावत, या सदस्यांनी भाजपच्या उमेदवारांना मतदान केले किंवा त्यांना पाठिंबा दिला. या विश्वासघातामुळे स्थानिक पातळीवर काँग्रेससमोर मोठे राजकीय संकट उभे राहिले. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कोणताही विलंब न लावता तात्काळ निलंबनाचा कठोर निर्णय घेतला.

# नरेंदर कब मिलेगा सिलेंडर

## वंचितने छेडले राज्यव्यापी आंदोलन!

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वंचित बहुजन आघाडीची पत्रकार परिषद घेऊन देशभरातील गॅस सिलेंडर तुटवड्याचा विरोधात सरकारला जाब विचारण्यासाठी ६ एप्रिल २०२६ रोजी नरेंदर कब मिलेगा सिलेंडर राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा करण्यात आली. अशी माहिती वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी दिली.

देशभरात गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुजरा मोदींच्या देश विकण्याच्या आर्थिक नितीमुळे देशात गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा झाला आहे.



महिला, गृहिणी, मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना स्वयंपाकाच्या गॅससाठी तासनतास लांब रांगेत उभे राहावे लागत आहे, तरीही गॅस मिळत नाही. गॅस सिलेंडरचा काळाबाजार सुरू आहे. ९१२ रुपयांचा सिलेंडर काळाबाजारात ५००० ते ७५०० रुपयांना विकला जात आहे.

भाजपा सरकारला जाब विचारण्यासाठी प्रत्येक जिल्हा, शहर, तालुका ठिकाणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नरेंदर कब मिलेगा सिलेंडर आंदोलन ६ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयाच्या ठिकाणी हे आंदोलन करण्यात येणार आहे. वंचित बहुजन आघाडीच्या प्रवक्ता उत्कर्षाताई रूपवते, मुंबई प्रदेशाध्यक्ष चेतन अहिरे, महिला आघाडी मुंबई प्रदेशाध्यक्ष स्नेहल सोहनी आणि युवा आघाडीचे मुंबई प्रदेशाध्यक्ष सागर गवई पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# समृद्धी महामार्गावर अपघात ७ महिला कामगारांचा मृत्यू

जालना (वृत्तसंस्था)

समृद्धी महामार्गावर एक भीषण अपघात झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. जालन्यात समृद्धी महामार्गावर हा अपघात झाला असून या अपघातात सात कामगार महिलांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. याशिवाय तीन ते चार जण गंभीर जखमी असल्याचं सांगितलं जात आहे.

जालन्यातली कडवंचीजवळ हा भीषण अपघात झाला. कामगारांना घेऊन जाणाऱ्या महिंद्रा पिकपला भरधाव ट्रकने उडवल्याने हा भीषण अपघात झाला. या अपघातात सात महिला कामगारांचा मृत्यू झाला असून मृत्यूचे संख्या वाढण्याची शक्यता आहे. अपघातातील मृत्यू झालेले कामगार बदनापूर तालुक्यातील केळीगव्हाण आणि खादगाव येथील असल्याची माहिती आहे. जालना पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.जालन्यातील कडवंचीजवळ समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात झाला आहे. समृद्धी महामार्गावर काम करणाऱ्या कामगारांच्या महिंद्रा पिकपला ट्रकची जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात झाल्याची महिती समोर आली आहे. या अपघातात सात कामगारांचा जागीच मृत्यू झाला असून चालकासह ८ ते ९ जण गंभीर जखमी असल्याने त्यांना उपचारासाठी जालन्यातील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. बदनापूर तालुक्यातील केळीगव्हाण आणि खादगाव परिसरातील १५ कामगार एबी इंटरप्राईजेस या कंपनीकडून समृद्धी महामार्गावरील स्वच्छता करण्यासाठी रोज जातात. महिला कामगारांना घेऊन जात असताना हा अपघात झाला. या परिसरातील १५ महिला कामगार महिंद्रा पिकअपमध्ये बसून जात असताना भरधाव येणाऱ्या ट्रकने महिंद्रा पिकअपला धडक दिली.

# 10 वी-12 वी निकाल पद्धतीत बदल

## आता एकाच प्रमाणपत्रात सर्व माहिती

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता १०वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गुणपत्रिका आणि प्रमाणपत्रांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. स्वतंत्र गुणपत्रिका आणि प्रमाणपत्रे देण्याऐवजी, विद्यार्थ्यांना आता एकच संयुक्त प्रमाणपत्र मिळेल. याशिवाय, विद्यार्थ्यांची संपूर्ण नावे त्याच क्रमाने (विद्यार्थ्याचे नाव, वडिलांचे नाव आणि आडनाव) लिहिली जातील.या संदर्भात, राज्य मंडळाने सर्व विभागीय मंडळांना सूचना देणारे एक परिपत्रक जारी केले आहे. राज्य मंडळाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे, ही नवीन प्रणाली फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या परीक्षेपासून लागू केली जाईल. एकत्रित प्रमाणपत्रात विद्यार्थ्याचे नाव, वडिलांचे नाव आणि आडनाव क्रमाने एकत्र छापले जाईल. यापूर्वी, प्रमाणपत्रांवरील नावांच्या वेगवेगळ्या क्रमाने अनेकदा तांत्रिक समस्या निर्माण होत होत्या.या बदलामुळे अशा समस्यांपासून दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या प्रवेशपत्रांवर विद्यार्थ्याचा फोटो अस्पष्ट असल्यास, त्यावर योग्य फोटो चिकटवून तो संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्यांकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांचे फोटो दुरुस्त केले आहेत, त्यांची अचूक माहिती संयुक्त प्रमाणपत्रावर योग्यरित्या नोंदवली जाईल याची खात्री करण्यासाठी, त्यांचे फोटो पुन्हा अपलोड करणे आवश्यक आहे. या उद्देशासाठी मंडळाच्या वेबसाइटवर एक फोटो दुरुस्ती लिंक देखील सक्रिय करण्यात आली आहे . सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांना त्यांच्या नावांच्या नवीन क्रमाबद्दल माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या नावातील कोणतीही चूक विभागीय मंडळामार्फत तात्काळ दुरुस्त करावी. सर्व माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना प्राचार्य, विद्यार्थी आणि इतर संबंधित पक्षांना लेखी माहिती देण्याचे आणि अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# प्रदूषणग्रस्त नद्यांना दिलासा; राज्य सरकारची मोठी पावले

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील नद्यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी आणि नद्यांना पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी राज्य सरकारने 'महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बुधवारी घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्राधिकरणासह साकळाई सिंचन योजना, अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ



अशा विविध लोककल्याणकारी निर्णयांवर मोहोर उमटवण्यात आली.

नर्मदा, तापी, गोदावरी आणि कृष्णा यांसारख्या प्रमुख नद्यांचे वरदान महाराष्ट्राला लाभले आहे. मात्र, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२५ च्या अहवालानुसार, देशातील सर्वाधिक ५४ प्रदूषित नदी-पट्टे महाराष्ट्रात आहेत. यात मिठी, मुळा-मुठा, भीमा, पंचगंगा आणि चंद्रभागा यांसारख्या नद्यांचा समावेश आहे. या नद्यांचे प्रदूषण दूर करण्यासाठी हे प्राधिकरण 'नोडल एजन्सी' म्हणून काम करेल.

या प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री आणि उपाध्यक्ष पर्यावरण मंत्री असतील. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून २ हजार कोटी, शासनाचा १०० कोटींचा वाटा आणि गौण खनिज उत्खननातून मिळणाऱ्या महसुलाचा १० टक्के हिस्सा दरवर्षी प्राधिकरणाला मिळणार आहे. बीएनएचएस आणि मँग्रोव्ह सेल यांसारख्या संस्थांचा तांत्रिक कामात सहभाग असेल. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा आणि नगर तालुक्यातील ३२ गावांसाठी वरदान ठरणारी 'साकळाई उपसा सिंचन योजना' अखेर मार्गी लागली आहे. यासाठी १ हजार २३४ कोटी १३ लाख रुपयांच्या तरतुदीला मंजुरी देण्यात आली. यासाठी घोड धरणातून चार टप्प्यांत १.८० टीएमसी पाणी उचलले जाईल. यामुळे ९ हजार ६०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून अवर्षणग्रस्त गावांचा पाण्याचा प्रश्न सुटेल.

# कांदा दर कोसळल्याने शेतकरी हवालदिल

## सरकारकडून तातडीच्या हस्तक्षेपाची गरज



मुंबई (वृत्तंसस्था)

कांद्याच्या दरात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे महाराष्ट्रातील शेतकरी संकटात सापडले आहेत. उत्पादक संघटनेने सरकारला बाजार हस्तक्षेप योजना लागू करण्याचा इशारा दिला आहे.महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने कांद्याच्या दरातील मोठी घसरण रोखण्यासाठी सरकारने तातडीने बाजार हस्तक्षेप योजना (चखड) लागू करावी, असे आवाहन केले आहे.

संघटनेच्या मते, दरातील घसरणीमुळे शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष भरत दिघोळे म्हणाले की, कांद्याच्या दरात ५० टक्क्यांहून अधिक घसरण झाली आहे, जे स्पष्टपणे शेतकऱ्यांच्या नाइलाजाने विक्रीची परिस्थिती दर्शवते आणि बाजार हस्तक्षेप योजना लागू करण्यासाठी आवश्यक निकष पूर्ण करते.तात्काळ कारवाई न केल्यास राज्यव्यापी आंदोलने सुरू केली जातील, असा इशारा त्यांनी दिला. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने तातडीने कारवाई करावी, असे आवाहन त्यांनी केले. बाजार हस्तक्षेप योजना (चखड) ही पंतप्रधान-आशा योजनेचा एक भाग आहे. नाशवंत आणि भाव आधार योजनांमध्ये समाविष्ट नसलेल्या कृषी व फळबाग उत्पादनांसाठी शेतकऱ्यांना योग्य भाव मिळवून देणे, हा याचा उद्देश आहे.

# शिर्डीत साईभक्ताला पेरू विक्रेत्यांकडून बेदम मारहाण डोक्याला पडले आठ टाके

## तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

शर्डी -जगप्रसिद्ध साईनगरीत दर्शनासाठी आलेल्या एका साईभक्ताला पेरू विक्रेत्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना गेट नंबर २ जवळ घडली आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या या वादात पेरू विक्रेत्या महिलेने भाविकाच्या डोक्यात लाकडी फळी मारल्याने भाविक गंभीर जखमी झाला असून, त्याच्या डोक्याला तब्बल ८ टाके पडले आहेत. या भीषण प्रकारामुळे शिर्डीतील भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, संस्थानची सुरक्षा व्यवस्था नेमकी करते काय? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

उत्तराखंड येथील रहिवासी राजेंद्रसिंग आनंसिंग रावत हे मंगळवारी साई मंदिर परिसरातून जात असताना, त्यांचा पाय चुकून एका पेरू विक्रेत्या महिलेच्या टोपलीला लागला. रावत यांनी तातडीने माफी मागितली, मात्र तरीही संबंधित विक्रेत्यांनी त्यांना 'शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर तिथे उपस्थित असलेल्या दोन महिला आणि एका युवकाने रावत यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. एका महिलेने त्यांच्या डोक्यात लाकडी फळीने प्रहार केल्यामुळे प्रचंड रक्तस्राव झाला. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले.

याप्रकरणी शिर्डी पोलिसांनी मुस्कान शेख, फरीदा शेख आणि सोहेल शेख (सर्व रा. शिर्डी) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेनंतर जागे झालेल्या शिर्डी नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाने परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाईची मोहीम उघडली आहे. अनेक सायकली आणि टपऱ्या जप्त करण्यात आल्या आहेत. मात्र, सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, ज्या ठिकाणी ही मारहाण झाली, तिथे साई संस्थानचे सुरक्षा कर्मचारी, पोलीस आणि एमएसएफचे जवान तैनात असतानाही हा प्रकार घडला. सुरक्षा यंत्रणेच्या डोळ्यांदेखत भाविक रक्ताळला जात असेल, तर त्यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास कसा ठेवायचा? अशी चर्चा आता सर्वत्र रंगली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून ही बातमी वारंवार प्रसारित होत असल्याने साईनगरीची प्रतिमा देशभरात मलिन होत असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. साईंच्या चरणी येणारा भक्त जर इथेच सुरक्षित नसेल, तर या सुरक्षेचा काय उपयोग? असा सवाल उपस्थित केला जात आहे. शिर्डीत येणाऱ्या भाविकांना केवळ फेरीवालेच नव्हे, तर गंध लावणारे आणि बळजबरीने पैसे मागणारे यांचाही मोठा त्रास सहन करावा लागतो. संस्थानकडे अवाढव्य सुरक्षा फौजफाटा असूनही असे प्रकार वारंवार घडणे हे दुर्दैवी आहे. अशा घटनांमुळे साईनगरीची बदनामी होत असून प्रशासनाने आता केवळ तात्पुरती कारवाई न करता, कायमस्वरूपी कडक निर्बंध लादण्याची गरज आहे.

# कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्जास 15 एप्रिलपर्यंत मुदतवाढ



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत सन २०२५ साठी विविध कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यास १५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ होती.

राज्यातील शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी विविध पुरस्कार दिले जातात. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न आदी पुरस्कारांचा समावेश आहे. यंदा प्रथमच कृषी विभागाने अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात सुरू केली आहे. यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर कृषी पुरस्कार या टॅबमध्ये अर्ज सादर करता येत आहेत. या प्रणालीमुळे अर्ज सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन व अहवाल निर्मिती प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व वेळबद्ध होणार आहे. दरम्यान, ऑनलाईन प्रणालीचे हे पहिलेच वर्ष असल्याने तसेच जिल्हा पोलीस अधीक्षकांकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यास वेळ लागत असल्यामुळे अनेक अर्ज प्रलंबित राहिले होते.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, ७१ लाख महिला अपात्र




मुंबई (वृत्तसंस्था)

राज्य सरकारची 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना आता मोठ्या वादाच्या भोऱ्यात सापडण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू झालेल्या या योजनेत तब्बल ७१ लाख महिला अपात्र ठरल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या अपात्र महिलांच्या खात्यावर गेल्या २० महिन्यांत सरकारने सुमारे २१ हजार ३०० कोटी रुपये जमा केले आहेत.

२०२४ पासून लाडकी बहीण योजना सुरू असून महिलांच्या खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा होत आहेत. सुरुवातीला तब्बल २ कोटी ६२ लाख अर्ज दाखल झाले होते. मात्र, छाननीमध्ये अनेक त्रुटी समोर आल्या. चारचाकी वाहन असणे, कुटुंबातील सदस्य सरकारी सेवेत असणे किंवा तांत्रिक कारणांमुळे जवळपास १० लाख महिला आधीच अपात्र ठरल्या होत्या. योजनेत अनेक अपात्र महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर पात्र महिलांची खातरजमा करण्यासाठी राज्य सरकारने ई-केवायसी बंधनकारक केली होती.

महिला व बालविकास विभागाने केलेल्या या पडताळणीमुळे आता सरकारचे दरमहा होणारे १०६५ कोटी रुपयांचे नुकसान टळणार आहे. एप्रिल २०२६ पासून या अपात्र महिलांना मिळणारे १५०० रुपये बंद केले जाणार आहेत. मात्र, गेल्या २० महिन्यांपासून जे मानधन दिले गेले, त्या अवाढव्य खर्चाची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न आता विरोधकांकडून विचारला जाण्याची शक्यता आहे.

सरकारने पून्हा ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ज्या महिला आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत, त्यांच्या खात्यात मे महिन्यापासूनचे पुढील हप्ते जमा केले जाणार नाहीत. तसेच, त्यांचे नाव तात्पुरते निलंबित होऊ शकते.

# कुंभमेळ्याच्या रिंग रोडला असलेला अडथळा अखेर संपला

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक- मागील काही दिवसांपासून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या रिंग रोड साठी अडकून पडलेल्या भूसंपादन प्रक्रियेला उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांच्या प्रयत्नांना यश आले असून या प्रकरणात पहिली खरेदी झाली आहे आणि महिला शेतकरी कोट्याधिश झाली .

कुंभमेळ्यात कोट्यवधी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन ६६.१५ किलोमीटर लांबीच्या नाशिक वर्तुळाकार मार्गाला मान्यता देण्यात आली आहे. चार ते सहा पदरी हा मार्ग शहरालगतच्या २५ गावांतून जाणार आहे. डीआरडीओ जंक्शन (राष्ट्रीय महामार्ग ६०) पासून सुरू होऊन शहराला वळसा घालत पुन्हा त्याच महामार्गाला जोडला जाईल. चार राष्ट्रीय महामार्ग व चार राज्य महामार्गांना जोडणारा हा मार्ग शहरातील वाहतूक कोंडी दूर



करण्यात तसेच सिंहस्थ काळात अखंड वाहतूक सुलभ करण्यास महत्त्वाचा ठरणार आहे. या प्रकल्पासाठी ३६५ हेक्टर जमिनीचे संपादन केले जाणार असून त्यात काही शासकीय जमिनीचाही समावेश आहे. भूसंपादनात नोटीससाठी १५० दिवसां कालावधी असतो. थेट खरेदीच्या माध्यमातून अवघ्या ६७ दिवसांत या जागेची खरेदी दृष्टीपथास आली.

प्रशासनाने रेडी रेकनरच्या चार पट आणि २५ टक्के अधिक मोबदला देऊन थेट खरेदीची तयारी दर्शविली. तीन वर्षांत त्या भागात जागांना मिळालेल्या दरांचे (खरेदीखत) अवलोकन करून अधिकाधिक मोबदल्याचा लाभ देण्याचे नियोजन केले आहे. थेट खरेदीत सहभागी होण्याची तयारी अनेक शेतकऱ्यांनी दर्शविली आहे. या थेट खरेदीला मंगळवारी सुरुवात करण्यात आली. इंदुबाई गायकवाड यांची दिंडोरी तालुक्यातील मानोरी येथील ३३ गुंठे जागा शासनाने या माध्यमातून खरेदी केली. याप्रसंगी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद उपस्थित होते. त्यांच्या हस्ते गायकवाड यांना मोबदल्यापोटी तीन कोटी १९ लाख ६५ हजार ४२० रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. याप्रसंग भूसंपादन अधिकारी राजेंद्र वाघ आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. थेट खरेदीला प्रोत्साहन देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. नाशिक वर्तुळाकार मार्गासाठी ७० वर्षीय इंदुबाई गायकवाड या जमीन देणाऱ्या पहिल्या शेतकरी ठरल्या. याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला.

अवघ्या ६७ दिवसांमध्ये नोटीस दिल्यानंतर ही खरेदी झाली आहे या भागातील शेतकऱ्यांचा काही प्रमाणामध्ये विरोध होता पण भूसंपादन अधिकारी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांनी जी मेहनत घेतली शेतकऱ्यांना जे आश्वासन दिले त्याची पूर्तता केली त्यांच्यावरती विश्वास ठेवून या भागातील शेतकऱ्यांनी भूसंपादन प्रक्रियेला असलेला विरोध हा कमी केला आणि त्यामुळे जो अडथळा होता तो दूर करण्यात मोठ्या प्रमाणावर ती उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांच्या प्रयत्नांना यश आले आणि जी निर्माण झालेली कोंडी होती ती मात्र फुटली.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरक्षित, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line : 7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# श्रीक्षेत्र संगमनेर खुर्द येथे कीर्तनाचा उत्सव व जागर

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
सालाबादप्रमाणे हनुमान जयंती चे औचित्य साधून श्रीक्षेत्र संगमनेर खुर्द येथे दि. २ एप्रिल ते ९ एप्रिल २०२६ या काळात सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

विठ्ठल रुक्मिणी आणि हनुमान मंदिरासमोर अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित करण्यात आलेल्या उत्सव कीर्तनाचा जागर हरिनामाचा धार्मिक उत्सवात ज्ञानेश्वरी पारायण सोहळा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा संपन्न होणार आहे. ह. भ. प. सुनील महाराज पवार, ह. भ. प. नंदकिशोर महाराज देवकर, राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. माऊली महाराज वाबळे, ह. भ. प. कैलास गिरीजी महाराज, ह. भ. प. कबीर महाराज अत्तार, ह. भ. प. ह. भ. प. सुदाम महाराज पानेगावकर, ह. भ. प. कविराज महाराज झावरे यांचे कीर्तन सेवा होणार असून हरिनाम सप्ताहाची सांगता ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित कीर्तन सेवेचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संगमनेर खुर्द ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादीत वाढला गृहकलह पटेल, तटकरेंचे स्थान डळमळीत



मुंबई
(वार्ताहर)-
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षात गोंधळाची स्थिती निर्माण झाली असून पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला परस्पर पाठवलेल्या एका पत्राने पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या पदांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पक्षाध्यक्ष अजित पवारयांचा विमान अपघातामध्ये २८ जानेवारी रोजी मृत्यु झाला. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी २६ फेब्रुवारी रोजी निवड झाली. त्यानंतर पक्षाच्या वतीने पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी १० मार्च रोजी केंद्रीय निवडणूकआयोगाला एक पत्र पाठवले. त्या पत्रामध्ये २८ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यानचा पत्रव्यवहार अधिकृत धरला जाऊ नये, असे म्हटले आहे.

या पत्रामध्ये पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची यादी दिली आहे. त्यामध्ये शिवाजी गर्जे यांना खजिनदार म्हटले आहे. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे , छगन भुजबळ, माणिकराव कोकाटे, दिलीप वळसे पाटील, चेतन तुपे, शेखर निकम, सुबोध मोहिते, सरोज अहिरे, जय पवार आणि धीरज शर्मा या १४ पदाधिकाऱ्यांच्या नावांचा उल्लेख आहे. मात्र प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांची नावे पदाशिवाय नमूद आहेत. खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कोणता आणि अपात्रता यासंबंधीच्या याचिकांवर अंतिम सुनावणी दरम्यान जर हे पत्र सर्वोच्च न्यायालयात गेले, तर ते पक्षाला मोठ्या अडचणीत आणू शकते, अशी भीती राष्ट्रवादीच्या नेत्यांना आहे. हे पत्र पाठवण्यासंदर्भात पक्षाचे राज्यसभा सदस्य पार्थ पवार आग्रही होते, अशी चर्चा आहे.

अजित पवार हयात असताना २० मे रोजी आयोगाला पाठवलेल्या पत्रामध्ये प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांच्या नावासमोर राष्ट्रीय कार्याध्यक्ष आणि प्रदेशाध्यक्ष असे उल्लेख आहेत. मग, १० मार्च रोजीच्या पत्रात या दोघांच्या पदांचे उल्लेख का टाळले असा प्रश्न विचारला जातो आहे. सुनेत्रा पवार सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्या दिड वर्ष राज्यसभा सदस्य होत्या. संसदेच्या अधिवेशनाचा उद्या शेवटचा दिवस आहे. राज्यसभेतील सहकाऱ्यांच्या भेटीसाठी त्या दिल्लीत आल्याचे सूत्रांनी सांगितले. मागच्या आठवड्यात देवगिरी निवासस्थानी राष्ट्रवादीच्या नेत्यांची बैठक झाली. निवडणूक आयोगाला सुनेत्रा पवार यांनी घाईघाईने पाठवलेल्या पत्रासंदर्भात वरिष्ठ नेत्यांनी नाराजी व्यक्त केली. आयोगाला पत्र पाठवण्यापूर्वी त्यांनी विश्वासात घ्यायला हवे होते, असे पटेल व तटकरे यांनी निदर्शनास आणून दिले. पुढील कायदेशीर गुंतागुंत टाळण्यासाठी आयोगाला पाठवलेले पत्र मागे घेणे हा पर्याय असल्याची सूचना या बैठकीत या नेत्यांनी केली.

# राजूर च्या नवाळी समाजाचा 'देवकाठी' सोहळा उत्साहात



राजूर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या राजूर नगरीत श्रद्धेचा जनसागर उसळला होता. निमित्त होते, महर्षी वाल्मिक ऋषी विश्वस्त मंडळ व नवाळी समाज यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पारंपरिक 'देवकाठी' यात्रोत्सवाचे. पिढ्यानपिढ्या चालत आलेला हा वारसा आजही तितक्याच निष्ठेने जपणाऱ्या नवाळी समाजाने या उत्सवातून समाजहित आणि एकात्मतेचे दर्शन घडवले.

हा केवळ एक उत्सव नसून, ती एक अखंड चालत आलेली साधना आहे. राजूर ते रंधाफॉल या मार्गावर निघालेल्या या 'देवकाठी' दिंडीत ५ वर्षांच्या बालकांपासून ते ७० वर्षांच्या वृद्धांपर्यंत सर्वजण सहभागी झाले होते. कडाक्याचे ऊन किंवा प्रवासाचा थकवा यांच्यावर श्रद्धेने मात करत, 'भंडारा' उधळत निघालेली ही दिंडी पाहताना भक्तीचे एक अनोखे चैतन्य अनुभवायला मिळाले. गेल्या आठ वर्षांपासून या यात्रोत्सवाला समाजकारणाची जोड देण्यात आली आहे. देवकाठी स्थानापन्न झाल्यावर होणारी महाआरती आणि त्यानंतर सातशे ते आठशे भाविकांनी घेतलेला महाप्रसादाचा लाभ, हे नवाळी समाजाच्या दातृत्वाचे प्रतीक ठरले.

राजूर-केळुंगण-माळेगाव-कातळापूर मार्गे रंधाफॉल येथील घोरपडा देवीच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी निघालेली ही दिंडी शिस्त आणि उत्साहाचा आदर्श घालून देते. परंपरा ही केवळ जपण्यासाठी नसते, तर ती पुढच्या पिढीला संस्कार म्हणून देण्यासाठी असते. नवाळी समाजाने जपलेली ही देवकाठीची परंपरा आजच्या काळात समाज बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे नवाळी परिवाराचा वतीने विविध सरकारी पदावर असलेल्या अधिकारी यांचा गुणगौरव करण्यात आला.

या उत्सवात केवळ नवाळी परिवारच नाही, तर संपूर्ण पंचक्रोशीतील समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जात-पात आणि भेदभावा पलीकडे जाऊन श्रद्धेच्या एका धाग्यात सर्वजण गुंफले गेले होते. पूर्वजांनी दिलेला हा वारसा भविष्यातही असाच तेवत ठेवण्याचा संकल्प यावेळी प्रत्येक भाविकाच्या डोळ्यात दिसत होता.

# हनुमान जयंती परंपरेचा सोहळा उत्साहात

(पान ०१ वरुन)-
पवनपुत्र हनुमान आणि प्रभू श्रीरामचंद्रांचा जयघोष करत उपस्थित आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्यासह शेकडो महिलांनी एकत्र येत हनुमानाचा रथ ओढत महिलांनी हनुमान रथ ओढण्याची परंपरा आजही कायम जपली आहे

दरवर्षाप्रमाणे याही वर्षी हनुमान जयंती निमित्त सकाळी आठ वाजता संगमनेर शहर पोलीस स्टेशनपासून पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्यासह पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी वाजत गाजत भगवा ध्वज घेऊन चंद्रशेखर चौकातील मोठ्या मारुती मंदिराजवळ आले आणि सजवलेल्या रथाला विधिवत भगवा ध्वज लावण्यात आला.यावेळी

आमदार अमोल खताळ व पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या हस्ते पवनपुत्र हनुमानरायाची महाआरती करण्यात आली. त्यानंतर आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्यासह शेकडो महिलांनी हनुमान रथाचा दोर हातात धरून चंद्रशेखर चौकापर्यंत रथ ओढला त्यानंतर ही मिरवणूक चंद्रशेखर चौकातून रंगार गल्ली, कॅप्टन लक्ष्मी चौक, लालबहादूर शास्त्री चौक, नगर पालिका,चावडी चौक, जुना कटारिया बाजारपेठ, तेलीखुंट, नेहरूचौक मार्गे पुन्हा चंद्रशेखर चौकातील मोठ्या मारुती मंदिरात या मिरवणुकीची सांगता झाली.

. ही मिरवणूक शांततेत पार पाडण्या साठी पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

हा उत्सव यशस्वी करण्यासाठी श्रीराम नवमी व हनुमान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सोमनाथ पराई, उपाध्यक्ष कमलाकर भालेकर, राजाभाऊ देशपांडे, वरद बागुल, चंद्रशेखर हिंदू मंडळाचे अध्यक्ष शुभम लाहामगे, महिला शक्ती सदस्य देवयानी जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले

चौकट

हनुमान राठोत्सव मिरवणूक मार्गावर शिवसेना माजी शहरप्रमुख स्व.आप्पा साहेब केसेकर यांच्या परिवाराकडून नाश्त्याची सोमनाथ गवंडी व सुरेंद्र गवंडी परिवाराकडून राजगिरा लाडू, गजानन एजन्सीकडून बिसलरी थंड पाण्याची बॉटल तर कल्पेश मर्दा, वाल्मीक तरुण मित्र मंडळ व आकाश जेथे मित्र मंडळ यांच्या वतीने थंडगार शरबताचे वाटप करण्यात आले.

# बाळासाहेब मालुंजकर यांचे निधन



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
तालुक्यातील घुलेवाडी येथील मालुंजकर मळा येथे राहणारे बाळासाहेब किसन मालुंजकर यांचे बुधवार दिनांक एक एप्रिल रोजी सायंकाळी अकस्मात निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कै. बाळासाहेब मालुंजकर हे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथे कार्यरत होते. हसतमुख व्यक्तीमत्वाचे धनी होते. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्यावर गुरुवारी सकाळी संगमनेर येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. बाळासाहेब मालुंजकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

HAPPY Birthday
शुभेच्छुक
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
YUVA POLYPRINT & PACKAGING INDUSTRIES

मा. पायल ताई ताजणे
भाजप संगमनेर शहराध्यक्षा

मा. मंगेश वाघमारे
प्राध्यापक

# संगमनेरचा ऐतिहासिक श्री हनुमान जयंती रथोत्सव...



संगमनेरचे श्री मोठे मारुती मंदिर व श्रीराम मंदिर ही प्राचीन काळातील मंदिरे गावातील नागरिकांच्या श्रध्देची स्थाने आहेत. त्यातही पूर्वापार दरवर्षी निघणारी मारुती मंदिरातील हनुमानाच्या रथाची मिरवणूक ही वैशिष्ट्यपूर्ण असते. अगदी आपला भारत देश पारतंत्र्यात असतानाही ही मिरवणूक प्रत्येक हनुमान जयंतीच्या दिवशी निघत असे. परंतु विसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतात स्वातंत्र्याची मागणी जोर धरू लागली होती. ठिकठिकाणी ब्रिटिशांविरुद्ध आंदोलने सुरू झाली होती.

संगमनेरला हनुमानजयंती साजरी करण्यासाठी आणि रथोत्सवासाठी मोठ्या संख्येने लोक एकत्र येत असत. १९२७ पासून या गोष्टीला सरकारने अडथळे आणायला सुरुवात केली होती. पण १९२९ या वर्षी मात्र इथल्या तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्याने अधिकाराचा अतिरेक करत की, आणि हे जमणारे नागरिक देखील आपल्या ब्रिटिश सरकारच्या विरोधात आंदोलन करतील, या भीतीने त्याने मंदिरात हनुमान जन्मोत्सव होणार नाही आणि रथाची मिरवणूक काढण्यास संपूर्ण बंदी असणार आहे, असा जुलूमी आदेशच काढला. झालं, बातमी गावभर पसरली. आदल्या दिवशी रात्रीपासूनच ब्रिटिश पोलिसांचा मंदिराबाहेर पहारा सुरू झाला.

हनुमानाचा जन्म सकाळी सहा वाजता असतो. बघूया मंदिरात जाता येईल का, नाही रथयात्रा तर निदान जन्म सोहळा तरी करून घेऊ, असा विचार करून गावातील भक्त आणि इतर नागरिक हळूहळू मंदिरापाशी जमू लागले. पोलीस बंदोबस्त जबरदस्त होता. नागरिकांच्या आग्रही मागणी आणि रेटच्यामुळे पोलिसांनी मंदिरात आतमध्ये जन्मसोहळ्यास परवानगी दिली. पण बाळ हनुमानाची मूर्ती घेऊन रथ मिरवता येणार नाही, असे निक्षून सांगितले. यामुळे लोकांमध्ये संताप निर्माण होत चालला होता. कसाबसा मारुतिरायाचा जन्म थोड्या लोकांनी मिळून मंदिरात करून घेतला.

आता पोलीस सगळ्यांना घरी हाकलू लागले. लोकांना रथ मिरवायचा होता, पण मार्ग सापडत नव्हता. मुठभर जनता आणि सशस्त्र पोलिसांचा मोठा फौजफाटा अशा कात्रीत रथोत्सव कसा व्हायचा, असा पेच निर्माण झाला. अचानक झुंबराबाई अवसक या महिलेने आणि तिच्या बरोबर उभ्या असलेल्या चौघी-पाच जणींनी मंदिरातील पाळण्यामध्ये असलेली हनुमानाची मूर्ती उचलली आणि कोणाच्याही लक्षात यायच्या आत ती मूर्ती रथावर नेऊन बसवली. निमिषार्धात घडलेल्या या घटनेने आजूबाजूला उभ्या असलेल्या सर्वांना थक्क करून टाकले. पोलिसांना काही उमजेपर्यंत सगळ्या महिला आणि सगळे गावकरी रथापाशी गोळा झाले. मारुतिरायाचा एकच जयघोष सुरू झाला. आता पोलिसही त्यांना अडवण्यासाठी धावत पुढे आले. त्यांनी बंदुका ही रोखल्या. पण जराही न डगमगता, जोशपूर्ण वातावरणात पाहता पाहता जमलेल्या सगळ्या महिलांनी रथाची दोरी हातात घेतली आणि रथ ओढायला सुरुवात केली. आणि जमलेल्या समस्त स्त्री-पुरुष मंडळींनी त्यांच्या हातांना आपल्या हातांचे बळ दिले. आणि ब्रिटिश पोलिसांचा शस्त्रसज्ज बंदोबस्त मोडून काढत वाजत-गाजत रथयात्रा संपन्न केली.

या इतिहासाची नोंद घेत स्वातंत्र्यानंतर आता पोलिसच भगवा झेंडा मिरवत आणतात. तो रथावर लावतात आणि मग मारुतिरायाच्या रथोत्सवाचा प्रारंभ होतो. विशेष बाब म्हणजे त्या ऐतिहासिक घटनेला महिलाशक्तीला अभिवादन म्हणून आजही रथोत्सवाचा प्रारंभ, रथ ओढण्याचा पहिला मान गावातील महिलांना असतो. गावातील सर्वसामान्य महिला सुरुवातीचे काही अंतर रथ ओढत नेतात. आणि देखणी मिरवणूक गावभर रथाला मिरवते. हा इतिहास आणि ही परंपरा संगमनेरच्या अभिमानाचा विषय आहे.

गेली अनेक वर्षे चंद्रशेखर हिंदू मंडळ आणि श्री रामनवमी हनुमानजयंती उत्सव समितीचे सर्व कार्यकर्ते तसेच महिलाशक्ती अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने या देदीप्यमान परंपरेला मोठ्या उत्साहाने आणि संपूर्ण भक्तिभावाने दरवर्षी संपन्न करत आहेत. जगभरात पसरलेले संगमनेरचे नागरिक या उत्सवासाठी एकदातरी हजेरी लावता यावी, म्हणून धडपडत असतात. आणि गावोगावचे भक्त सोहळा बघून चंद्रशेखर हिंदू मंडळ व श्रीरामनवमी हनुमानजयंती उत्सव समितीला ही आगळी-वेगळी परंपरा अधिक दृढ केल्याबद्दल धन्यवाद देत असतात.

## तमाशा कलावंतांवर...(पान १ वरुन)

लुटण्यात आल्याची माहिती विठाबाई नारायणगावकर यांचे नातू मोहित नारायणगावकर यांनी दिली. या भीषण घटनेनंतर जखमी कलावंतांमध्ये भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच राज्यभरातील तमाशा व लोककलावंत मोठ्या संख्येने एकत्र येत घारगाव पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. दरम्यान, 'डायल ११२' वरून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रात्री उशिरा घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. ८४/२६, बीएनएस ११९(१)७४, ११८(१), ११५ (२), ३५२, ३५३(१), ३२४(४), १८९(२) १९०, १९१ (१), १९१ (३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी सांगितले की, घटनेची गंभीर दखल घेण्यात आली असून आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

दरम्यान, या घटनेमुळे लोककलेच्या क्षेत्रात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, तमाशा कलावंतांच्या सुरक्षेसाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सर्व स्तरांतून जोर धरत आहे.

ही घटना समोर आल्यानंतर केवळ कलावंतच नाही तर सर्व स्तरातील समाजाने याचा तीव्र निषेध केला आहे. आरोपींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी देखील सार्वत्रिक होत आहे. दरम्यान पठार भागातील अवैध व्यवसाय व दारु अड्डे, वाळू उत्खनन यामुळे तरुण पिढी व्यवसानाकडे झुकली आहे. पोलिस देखील कर्तव्यापासून लांब असल्याने या भागात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. हप्तेखोरी व राजकीय हस्तक्षेप यामुळे देखील आरोपींना अभय मिळते. या प्रकरणात ते मिळु नये अशी मागणी केली जात आहे.

## संपादकीय...

# मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदी घाला

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात 'सोशल मीडिया' हा शब्द केवळ परवलीचा राहिलेला नाही, तर तो प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. आजचे युगच सोशल मीडियाचे युग आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या माध्यमांवर सक्रिय झाले आहेत. प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन असून त्यामध्ये व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, शेअरचॅट, स्नॅपचॅट, यूट्यूब यांसारख्या विविध सोशल मीडिया साईट्स सहज उपलब्ध आहेत. या माध्यमांवर सतत सक्रिय राहून आपण किती 'सोशल' आहोत हे दाखवण्याची स्पर्धा सुरू आहे. विशेषतः किशोरवयीन आणि तरुणांमध्ये या माध्यमांचे आकर्षण प्रचंड वाढले आहे. आजची युवा पिढी आपल्या दिवसातील मोठा वेळ सोशल मीडियावर घालवते. एका सर्वेक्षणानुसार भारतातील मुले दररोज सरासरी पाच तास सोशल मीडियावर व्यतीत करतात. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. कारण याचा अर्थ असा की मुले या माध्यमांच्या आहारी जात आहेत. अनेक मुले दिवसभर उपाशी राहू शकतात, पण सोशल मीडियापासून दूर राहू शकत नाहीत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे केवळ तरुणच नव्हे, तर शाळकरी मुलेही याच्या विळख्यात अडकली आहेत. तंत्रज्ञानाचे फायदे जितके आहेत तितकेच तोटेही आहेत, हे आपण मान्य केले पाहिजे. सोशल मीडियाचा अतिरेकी वापर मुलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम करत आहे. अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी याबाबत इशारा दिला असला तरी त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. उलट सोशल मीडियाचा वापर दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. त्यामुळे मुलांमध्ये तणाव वाढणे, चिडचिडेपणा वाढणे, एकाग्रतेचा अभाव निर्माण होणे यांसारख्या समस्या मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. काही मुले हिंसक वर्तनाकडे वळत असल्याचेही आढळते. यासोबतच शारीरिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहेत. सतत मोबाईल वापरल्यामुळे डोळ्यांचे विकार वाढले आहेत. अनेक मुलांना लहान वयातच चष्मा लागण्याची वेळ येत आहे. मैदानी खेळ पूर्णपणे विस्मरणात गेले असून मुले एकलकोंडी होत आहेत. सामाजिक संवाद कमी होत चालला आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे या सर्व गोष्टींचा थेट परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत आहे. अभ्यासावर लक्ष केंद्रित न होणे, एकाग्रता भंग होणे या समस्या वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर अनेक तज्ज्ञांनी किमान शाळकरी मुलांना तरी सोशल मीडियापासून दूर ठेवण्याची गरज व्यक्त केली आहे. काही शाळांनी विद्यार्थ्यांना शाळेत मोबाईल वापरण्यास बंदी घातली आहे. मात्र शाळा सुटल्यानंतर मुले पुन्हा सोशल मीडियाच्या आहारी जातात. त्यामुळे या समस्येवर अधिक कठोर उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. मुलांच्या सोशल मीडियाच्या वापरावर कायद्यानेच नियंत्रण आणावे, अशी मागणी आता जोर धरत आहे. भारतामध्ये अद्याप अशा प्रकारचा सर्वसमावेशक कायदा अस्तित्वात नसला, तरी काही राज्यांनी याबाबत सकारात्मक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. कर्नाटक सरकारने १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडियाच्या वापरावर बंदी घालण्याचा प्रस्ताव मांडला आहे. लहान मुलांची ऑनलाईन सुरक्षा आणि वाढत्या स्क्रीन टाइमपासून त्यांचे संरक्षण करणे, हा यामागील उद्देश आहे. हा निर्णय अत्यंत स्तुत्य असून इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. आंध्रप्रदेश आणि गोवा राज्यांनीही अशाच प्रकारचा विचार सुरू केला आहे. जगातील अनेक देशांनी याबाबत आधीच पावले उचलली आहेत. अमेरिकेतील फ्लोरिडा राज्याने शाळकरी मुलांच्या सोशल मीडियाच्या वापरावर कायद्याद्वारे निर्बंध आणले आहेत. ऑस्ट्रेलियातही १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियाचा वापर करण्यास बंदी आहे. या पार्श्वभूमीवर भारतातही केंद्र सरकारने एकसमान कायदा करण्याची गरज आहे. प्रत्येक राज्याने स्वतंत्र निर्णय घेण्याऐवजी संसदेत सर्वसमावेशक कायदा मंजूर झाल्यास तो संपूर्ण देशात प्रभावीपणे लागू होऊ शकतो. तथापि, केवळ कायदा करून ही समस्या पूर्णपणे सुटणार नाही. त्यासाठी जनजागृती आणि प्रबोधन तितकेच महत्त्वाचे आहे. मुलांना सोशल मीडियाचे दुष्परिणाम समजावून सांगणे, शाळांमध्ये चर्चासत्रे आयोजित करणे, पालकांनी देखील मुलांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा योग्य आणि मर्यादित वापर कसा करावा, याचे संस्कार बालपणापासूनच दिले गेले पाहिजेत. शेवटी, मुलांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी सोशल मीडियाच्या वापरावर नियंत्रण आणणे ही काळाची गरज बनली आहे.

# जिजामाता स्कूलच्या नवीन शैक्षणिक वर्षास जल्लोषात प्रारंभ



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

जिजामाता स्कूलमध्ये १ एप्रिल रोजी सीबीएसई बोर्डनुसार नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात करण्यात आली. नव्या आशा, नवे संकल्प आणि उज्ज्वल भविष्याची स्वप्ने डोळ्यांत घेऊन विद्यार्थी मोठ्या आनंदाने शाळेत दाखल झाले. शाळेच्या परिसरात पहिल्याच दिवशी चैतन्य आणि उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. रंगीबेरंगी फुगे, रांगोळी व आकर्षक सजावटीने शाळा परिसर उजळून निघाला होता.

कार्यक्रमाची सुरुवात परिपाठाने करण्यात आली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी लघुनाटिका सादर करत, त्यांच्यामध्ये चांगल्या सवयी रुजविण्याचा प्रयत्न केला. प्रसंगी शाळेचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर माणिकराव शेवाळे, सेक्रेटरी प्राध्यापक विठ्ठलराव शेवाळे उपस्थित होते. त्यानंतर शाळेच्या प्राचार्या सौ. जिज्ञासा कुलकर्णी व उपप्राचार्या सौ. माधुरी शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि पालकांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की, नवीन वर्ष म्हणजे केवळ नवीन वर्ग नव्हे, तर नवीन संधी, नवीन उद्दिष्टे आणि स्वतःला घडवण्याची नवी संधी आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, नियमितता, परिश्रम आणि सर्वांगीण विकास यांचे महत्त्व पटवून दिले.

यंदाच्या वर्षात विविध स्पर्धा, प्रकल्प, शैक्षणिक सहली, विज्ञान प्रदर्शन, क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रगतीच्या नव्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, असेही प्रतिपादन करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण संवाद साधून, त्यांच्या मनातील भीती दूर केली. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या आनंदासाठी खेळांद्वारे मनोरंजनात्मक उपक्रम घेण्यात आले. लहान मुलांनी पहिल्याच दिवशी उत्साहाने सहभाग घेतल्यामुळे वातावरण आणखी चैतन्यमय झाले. एकूणच, जिजामाता स्कूलचे नवीन शैक्षणिक वर्ष आनंद, उत्साह, प्रेरणा, संस्कार आणि प्रगतीच्या वातावरणात जल्लोषात सुरू झाले असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा सज्ज असल्याचे चित्र पहिल्याच दिवशी स्पष्ट झाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन, प्रशासन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# इंद्रजीत थोरातांच्या वाढदिवसानिमित्त जोर्वे येथे आरोग्य शिबिर उत्साहात

## ७२ नागरिकांची कॅन्सर तपासणी तर १५६ पाण्याचे जार वितरण



संगमनेर (प्रतिनिधी)-

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते बाळासाहेब थोरात मित्र मंडळाच्या वतीने गावातील गरीब महिलांना १५६ पिण्याच्या पाण्याचे जार चे वितरण करण्यात आले असून, वाढदिवसानिमित्त झालेल्या आरोग्य शिबिरात ७२ नागरिकांनी कॅन्सर तपासणी केली आहे.

दत्त मंदिर परिसरात इंद्रजीत भाऊ थोरात मित्र मंडळ व लोकनेते बाळासाहेब थोरात मित्र मंडळाच्या वतीने एस. एम. बी. टी. सेवाभावी संस्थेच्या सहकार्यातून कॅन्सर तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, यांसह विविध सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी इंद्रजीत भाऊ थोरात, सौ. आरती ताई थोरात, शरद नाना थोरात, बादशहा बोरकर, सिताराम वर्पे, बाबासाहेब शिंदे, संजय थोरात, विठ्ठल काकड, अनिल दिघे, डॉ. अश्विनी देशमुख, अविनाश आव्हाड, यांसह गावातील ग्रामस्थ नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी रक्तदान शिबिर ही संपन्न झाले. या रक्तदान शिबिरात ६७ नागरिकांनी रक्तदान केले. स्वतः इंद्रजीत भाऊ थोरात यांनीही आपल्या वाढदिवसानिमित्त रक्तदान केले.

यावेळी बोलताना इंद्रजीत भाऊ थोरात म्हणाले की, जोर्वे गावाला सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली गावांमध्ये सातत्याने विकासाच्या योजना राबवल्या आहेत. जोर्वे चे नाव हे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहे, परंतु काही मंडळी गावच्या राजकारणात गटतट करून विकास कामात अडथळे निर्माण करत आहे, हे अत्यंत चुकीचे आहे. युवकांनी घेतलेले उपक्रम सत्य आहे. शरद नाना थोरात जे कायम सामाजिक कामांमधून पुढे असतात, याचबरोबर महिलांवर झालेले अन्यायाच्या वेळी त्यांनी कायम आवाज उठवला आहे. युवकांनी समाज कामातून आदर्श निर्माण करावा, असे आवाहन त्यांनी केले.

शरद नाना थोरात म्हणाले की, आपल्याला सर्वांना सोबत घेऊन पुढे जायचे आहे, मात्र अन्याय झाला तर सहन करायचा नाही. या भागाच्या विकासासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली आपण सर्वांनी एकीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी सचिन दिघे, सुधाकर बलसाने, नवनाथ कातोरे यांनीही आपले मनोगती व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेंद्र कोल्हे यांनी केले. सूत्रसंचालन रामदास काकड यांनी केले, तर सोपान कोल्हे यांनी आभार मानले. यावेळी गावातील नागरिक, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृतवाहिनी बी फार्मसीच्या ४६ विद्यार्थ्यांची जेनेव्हा बायोफार्मासिटिकल कंपनीमध्ये निवड



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या अमृतवाहिनी शिक्षण संस्थेतील अमृतवाहिनी बी. फार्मसी मधील ४६ विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा पूर्वीच जेनोव्हा बायोफार्मासिटिकल लिमिटेड, पुणे या नामांकित कंपनीमध्ये चांगल्या पॅकेजवर निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. जे. चव्हाण यांनी दिली आहे.

विद्यार्थ्यांच्या झालेल्या प्लेसमेंट बाबत अधिक माहिती देताना प्राचार्य डॉ. चव्हाण म्हणाले की, अमृतवाहिनी बी फार्मसी, अमृतवाहिनी शिक्षण संस्था यांचा विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर सामंजस्य करार आहे. मेडिकल विभागातील १३ आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सामंजस्य करार असल्याने विविध कंपन्या महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांच्या कॅम्पस इंटरव्यू घेत आहेत.

संस्थेमध्ये स्वतंत्र ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग कार्यरत असून, त्या अंतर्गत विविध चर्चासत्रे, कार्यशाळा, याचबरोबर अभ्यासाव्यतिरिक्त कंपनीतील कार्यक्षेली बाबत माहिती दिली जात आहे. तसेच कंपन्यांशी भेट घडून आणली जात असून, यामधून विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना वाव दिला जात आहे.

जेनोव्हा बायोफार्मासिटिकल लिमिटेड, पुणे या कंपनीचे एचआर मॅनेजर निलेश खैरे आणि संपत आवरे यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखत घेतल्या, त्यापैकी ४६ विद्यार्थ्यांची चांगल्या पॅकेजवर निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांच्या नोकरी कमी प्लेसमेंट अधिकारी डॉ. दिनेश हासे, डॉ. सचिन गुंजाळ, प्रा. रेश्मा शेळके, माजी विद्यार्थी समन्वयक डॉ. संकेत काळमेघ यांनी विशेष प्रयत्न केले.


CorelDRAW Ps Ai Id
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
वाटचाल तीन दशकांची
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

पाहिजेत
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

त्वरित पाहिजेत
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

वॉचमन पाहिजे
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

पाहिजेत
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी ॲग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला, वेल्हाळे रोड
9860284257
raspberragroysales@gmail.com

पाहिजेत
सेल्समन - १ जागा
सर्विस प्रोव्हायडर हेल्पर ०१ जागा
अकाउंटंट - ०१ जागा
कामाचे ठिकाण : संगमनेर
M/s. Pawar and Sons
7498621873

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

हेल्पर पाहिजे
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

READ E- NEWS ON
Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta

बंगला भाड्याने पाहिजे
2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050






MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था
सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# अमरावती बनणार आंध्र प्रदेशची राजधानी, लोकसभेत विधेयक मंजूर

अमरावती (वृत्तसंस्था)

आंध्र प्रदेशची राजधानी म्हणून अमरावतीला अधिकृत आणि कायमस्वरूपी मान्यता देणारे 'आंध्र प्रदेश पुनर्गठन (संशोधन) विधेयक, २०२६' बुधवारी (१ एप्रिल) लोकसभेत ध्वनिमताने मंजूर करण्यात आले. या विधेयकाला सत्ताधारी भाजपसह काँग्रेस आणि तेलुगू देसम पक्षाने (टीडीपी) पाठिंबा दिला. त्यामुळे अमरावती हीच राज्याची एकमेव आणि स्थायी राजधानी राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विधेयकावर चर्चा करताना काँग्रेसचे खासदार मणिकम टैगोर यांनी पक्षाचा पूर्ण पाठिंबा जाहीर करताना आंध्र प्रदेशला विशेष राज्याचा दर्जा देण्याची मागणीही केली. त्यांनी अमरावतीचा विकास बेंगलुरु, चेन्नई आणि हैदराबाद यांसारख्या महानगरांच्या धर्तीवर व्हावा, असे मत व्यक्त केले. तसेच विशाखापट्टणम, तिरुपती आणि कुरनूल यांचाही समतोल विकास होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, टीडीपीचे खासदार आणि ग्रामीण विकास व संचार राज्यमंत्री चंद्रशेखर पेम्मासानी यांनी या विधेयकाला सर्वानुमते मंजुरी देण्याचे आवाहन केले. या निर्णयामुळे आंध्र प्रदेशला स्थिर आणि निश्चित राजधानी मिळणार असून राज्याच्या विकासाला गती मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

भाजपचे खासदार सी. एम. रमेश यांनी या विधेयकाचे समर्थन करताना सांगितले की, स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच संसदेत अशा प्रकारचे विधेयक आणण्यात आले आहे, ज्यामध्ये एखाद्या विशिष्ट ठिकाणाला राज्याची राजधानी म्हणून घोषित केले जात आहे. यामुळे भविष्यात राजधानीबाबत कोणताही गोंधळ निर्माण होणार नाही आणि अमरावतीचा विकास वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांनी मागील सरकारच्या तीन राजधानींच्या प्रस्तावावर टीका करत तो निर्णय अव्यवहार्य असल्याचे म्हटले. दुसरीकडे, वाईएसआर काँग्रेस पार्टी ने या विधेयकाला तीव्र विरोध दर्शवला. पक्षाचे खासदार पी. वी. मिथुन रेड्डी यांनी सरकारवर टीका करताना सांगितले की, अमरावतीसाठी सुमारे ३४ हजार एकर जमीन अधिग्रहित करण्यात आली होती. त्या वेळी शेतकऱ्यांना विकसित प्लॉट, घरकुल योजना आणि मुलांसाठी मोफत शिक्षण देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही.

# साधुसंतांच्या प्रबोधनातून हिंदुत्वाची शिकवण : आ. खताळ

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-



आमच्यासारख्या तरुणांना तुमच्या सारख्या महाराजांच्या प्रबोधनातून हिंदुत्वाची खऱ्या अर्थाने शिकवण मिळाली आहे. आज जगात इराण, इराक आणि इस्रायल या देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असली, तरी साधुसंतांच्या त्यागामुळे व हिंदुत्वाच्या विचारांमुळे भारताला चांगले दिवस पाहण्यास मिळत आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले. संगमनेर शहराजवळील गुंजाळवाडी राहणे मळा येथील अखंड हरिनाम सप्ताहास आमदार खताळ व पत्नी नीलम खताळ यांनी भेट दिली. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर संभाजीनगर, पैठण येथील शिवतांडव आणि बोबडी गवळण वादक संदीप महाराज खडांगळे यांच्यासह राहणेमळा सप्ताह कमिटीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, तुमच्या सारख्या संतांच्या मार्गदर्शनामुळे सर्वसामान्य जनतेच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आम्हाला प्रेरणा देत आहे. हाच आनंद मला तालुक्यात काम करण्यासाठी ऊर्जा देतो. मी दररोज दोन ते तीन ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताहास भेटी देत असतो आणि लोकांशी संवाद साधत असतो. या सर्वाच्या मागे अध्यात्मिक शक्ती महत्त्वाची आहे. अध्यात्मिक कार्यातूनच मला खऱ्या अर्थाने ऊर्जा मिळते आणि समाजासाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे, आमदार खताळ यांनी सांगितले. हा अखंड हरिनाम सप्ताह यशस्वी करण्यासाठी हरीश राहाणे, भाऊसाहेब राहाणे, वैभव राहाणे, जयदीप राहाणे, गोपाळ राहाणे, विलास राहाणे, अभिजित राहाणे, संजय आखाडे, अमोल वाकचौरे, अरविंद गाडेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

छत्रपती शिवाजी महाराज सामान्य नेतृत्व नव्हते, तर ते तुमच्या आमच्यासाठी आदर्श होते. त्यांनी महिलांचा सन्मान करून स्त्रीचे रक्षण केले. परंतु सध्या अत्याचाराचे आणि लव्ह जिहादचे प्रमाण वाढले आहे. जो बाप आपल्यासाठी ताठ मानेने उभा आहे, त्या बापाची मान कधीही खाली जाऊन देऊ नका, असा सल्लाही मुलींना संदीप महाराज खंडागळे यांनी दिला.

संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी राहणे मळा परिसरातील भाविकांना प्रथमच शिवतांडव व बोबडी गवळण श्रवण करण्याची संधी आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून मिळाली असल्याने राहणीमळा व गुंजाळवाडीकरांनी त्यांचे आभार व्यक्त केले. शिव तांडव व बोबडी गवळण गायनाने सर्व भाविक भक्त मंत्रमुग्ध होऊन गेले. या सप्ताहामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

# भोंदू खरातची केस लढवण्यास सरकारी वकिलाचा नकार

युवावार्ता (प्रतिनिधी)



नाशिक- भोंदू बाबा खरात प्रकरणात सरकारी वकील म्हणून कार्य करणारे अजय मिसर यांनी वाढत्या कामाच्या ताणामुळे खरात यांचा खटला लढविण्यास नकार दिला आहे. त्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे चांगलीच खळबळ उडाली आहे. दरम्यान या प्रकरणात मिसर यांनी अशी भूमिका का घेतली याबाबत उलट सुलट चर्चा सुरू असून त्यांच्यावर कोणाचा दबाव होता का अशी चर्चा सध्या नाशिकच्या प्रशासकीय आणि न्यायालयीन वर्तुळात सुरू आहे.

महाराष्ट्राला हादरवणाऱ्या आणि अनेक बड्या राजकारण्यांना घाम फोडणाऱ्या भोंदूबाबा अशोक प्रकरणात मोठी माहिती समोर आली आहे. सरकारी वकील अजय मिसर यांनी अशोक खरातविरोधात एसआयटीची केस लढण्यास असमर्थता दाखवली आहे. एसआयटीने विशेष सरकारी वकील अजय मिसर यांना ही केस चालवण्यासाठी लेखी पत्राद्वारे विनंती केली होती. मात्र सरकारी वकील ॲड. अजय मिसर यांनी केस चालवण्यास नकार दिला आहे. २०११ मुंबई साखळी बॉम्ब स्फोट खटला, रवी पुजारी प्रकरणातील महाराष्ट्रातील सर्व खटले तसेच अन्य महत्वाच्या खटल्याच्या न्यायालयीन चौकशीच्या कामामुळे या प्रकरणाला वेळ व न्याय देता येणार नसल्याने विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी केस चालवण्यास नकार दिल्याची माहिती समोर येत आहे. अजय मिसर यांनी नकार दिल्याने सहाय्यक सरकारी वकील शैलेंद्र बागडे हेच युक्तिवाद करणार आहेत. दरम्यान, शिर्डी येथील गुन्ह्याच्या तपासात अशोक खरात यांची पत्नी कल्पना खरात हिला चौकशीसाठी एसआयटी बोलविण्याच्या तयारीत असताना ती फरार झाली. अशोक खरातची पत्नी कल्पना खरात हिच्यासह पाच जणांविरोधात शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. कल्पना खरातला अटक करण्यासाठी एसआयटी पथक खरातच्या घरी पोहोचले. पण, कल्पना खरात फरार झाल्याने पथकाने अशोक खरात याच्या मुलाला ताब्यात घेतले आहे.

# ताराराणी जैन होत्या...

पान नं. १ वरुन -

ताराराणी या स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या होत्या. पुढे जाऊन त्यांनी कोल्हापूरच्या गादीची स्थापना केली. एकीकडे हा सर्व इतिहास असताना आचार्य नयन पद्मसागर यांनी मात्र त्यांच्या अकलेचे तारे तोडले आहेत. महाराणी ताराराणी या जैन समूदायाच्या असल्याचं वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. आचार्य नयन पद्मसागर यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्तुती केली. ते म्हणाले की, जो समाज धर्माला विसरतो त्याला भविष्य नसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आल्यानंतर भारत खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. त्याच्या आधी स्वातंत्र्य मिळालं पण गुलाम बहरत होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मंदिर निर्माण केले आणि हिंदुना मोठी भेट दिली. वयाच्या ७५ व्या वर्षी सुद्धा मोदीजी काम करतात. तुम्ही ते नाही करु शकत नाही. आचार्य नयन पद्मसागर पुढे म्हणाले की, कोणत्याही गल्लीत जा संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर , संत नामदेव ऐकू येतील. आमचा धर्म कोणताही असो पण भारतात राहणारा प्रत्येक हिंदू आहे. जैन धर्म कोणत्या जातीत भेद मानत नाही. संविधान अखंड भारत बनवण्यासाठी महत्त्वाचं आहे. संविधानमध्ये कोणत्याही धर्माला वगळले नाही. मात्र जो धर्म लोकांना मारायला शिकवतो त्यावर बंदी घाला.

READ E- NEWS ON
Yuvavarta.in

**संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. शिंदे संदिप किसनराव रा. मालदाड रोड, संगमनेर, म्यु.घ.नं. -, सि. स. नं. १३१/११/१ , स. नं. या ठिकाणी मध्ये कृषी सेवा केंद्र चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. ०१/०४/२०२६ **मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

**संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. शिंदे संदिप किसनराव रा. मालदाड रोड, संगमनेर, म्यु.घ.नं. -, सि. स. नं. - , स. नं. या ठिकाणी मध्ये कृषी सेवा केंद्र चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. ०१/०४/२०२६ **मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

**संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्रीमती शिंदे रंजना किसनराव रा. मालदाड रोड, संगमनेर, म्यु.घ.नं. -, सि. स. नं. - १२१/१६४, स. नं. या ठिकाणी मध्ये कृषी सेवा केंद्र चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. ०१/०४/२०२६ **मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

# संकट मोचन हनुमान उत्सव समिती संगमनेरतर्फे हनुमान जन्मोत्सवानिमित्त भव्य शोभायात्रा

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-



हनुमान जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून विविध ठिकाणी हा उत्सव जल्लोषात साजरा केला जात आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील संकट मोचन हनुमान उत्सव समिती, संगमनेर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य शोभायात्रा व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने (दि. २) सायंकाळी ५ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेची सुरुवात संगमनेर शहर पोलीस स्टेशन परिसरातील संकट मोचन हनुमान मंदिर येथून होणार असून ती संजय गांधी नगर, नेहरू गार्डन, माळीवाडा, चावडी, अशोक चौक, मोमीनपुरा मार्गे लोकमान्य रोड येथे समाप्त होणार आहे.

या शोभायात्रेदरम्यान मार्गावरील विविध ठिकाणी भाविकांकडून स्वागत करण्यात येणार असून फटाक्यांची आतषबाजी, पुष्पवृष्टी तसेच विविध आकर्षक देखावे हे या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून या सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, हनुमान जन्मोत्सवानिमित्त शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला असून सर्व भाविकांनी त्याचा लाभ घ्यावा, असेही आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# इराणवर आणखी कठोर हल्ले केले जातील - डोनाल्ड ट्रम्प



वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)-

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधात सुरू असलेल्या युद्धाबाबत मोठा दावा केला आहे. त्यांनी सांगितले की अमेरिका आपल्या रणनीतिक उद्दिष्टांच्या अत्यंत जवळ पोहोचला असून हे युद्ध लवकरच समाप्त केले जाईल. तसेच, कोणत्याही परिस्थितीत आपल्या सहयोगी देशांना नुकसान होऊ दिले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्राला संबोधित करताना डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की अमेरिका आणि इस्त्रायल यांच्या संयुक्त मोहिमेमुळे इराणला मोठे नुकसान सहन करावे लागले आहे. त्यांनी दावा केला की इराणची नौदल शक्ती जवळपास संपुष्टात आली आहे, त्यांची वायुसेना कमकुवत झाली आहे आणि अनेक मोठे नेते मारले गेले आहेत. तसेच इराणला पाषाण युगात पाठवण्याचा इशाराही त्यांनी दिला. या मोहिमेचा उद्देश इराणची लष्करी ताकद संपवणे हा होता आणि तो आता जवळपास पूर्ण झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

ट्रम्प यांनी विश्वास व्यक्त केला की अमेरिका लवकरच आपली सर्व उद्दिष्टे साध्य करेल. सध्या अमेरिका या युद्धात पूर्वीपेक्षा अधिक मजबूत स्थितीत असून शत्रू सतत कमकुवत होत असल्याचा दावा त्यांनी केला. येत्या २ ते ३ आठवड्यांत इराणवर आणखी कठोर हल्ले केले जातील आणि मिशन अतिशय लवकर पूर्ण होईल, असे त्यांनी म्हटले. तसेच, विशेषतः इस्त्रायलसह आपल्या सहयोगी देशांचे कोणत्याही प्रकारे नुकसान होऊ दिले जाणार नाही, याची त्यांनी पुनरुच्चार केला.ते म्हणाले की चर्चा यशस्वी न झाल्यास अमेरिका इराणमधील वीज प्रकल्प आणि इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करू शकते. याशिवाय त्यांनी इतर देशांना स्ट्रेट ऑफ होर्मुजसारख्या महत्त्वाच्या समुद्री मार्गांच्या सुरक्षेची जबाबदारी स्वतः घेण्याचे आवाहन केले.

ट्रम्प यांनी म्हटले की हे युद्ध अमेरिका आणि जगाच्या सुरक्षेसाठी आवश्यक होते. त्यांच्या मते, इराण दीर्घकाळापासून दहशतवादाला पाठिंबा देत असून तो अण्वस्त्र निर्मितीच्या अत्यंत जवळ पोहोचला होता. अमेरिका कोणत्याही परिस्थितीत इराणला अण्वस्त्र मिळवू देणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, कूटनीती हा अमेरिकेचा पहिला पर्याय होता; मात्र इराणने सर्व प्रस्ताव नाकारले. तसेच, याआधीच्या हल्ल्यांमध्ये इराणच्या अणुस्थळांना मोठे नुकसान झाल्याचा दावाही त्यांनी केला.

ट्रम्प यांनी सांगितले की अलीकडील काळात तेलाच्या किंमती वाढण्यास इराण जबाबदार आहे. त्यांनी आरोप केला की इराणने तेलवाहू जहाजांवर हल्ले करून जागतिक पुरवठ्यावर परिणाम केला आहे.ते पुढे म्हणाले की अमेरिका जगातील सर्वात मोठा तेल आणि वायू उत्पादक देश असून या संकटाला सामोरे जाण्याची त्यांची पूर्ण क्षमता आहे. तसेच त्यांनी सौदी अरेबिया, कतार, यूएई, कुवैत आणि बहरीन यांसारख्या प्रादेशिक सहयोगी देशांचे कौतुकही केले.

# महाराष्ट्र - पंजाब मध्ये दूध उत्पादन सामंजस्य करार

## दूध उत्पादनाचा संगमनेर पॅटर्न राज्यासाठी दिशादर्शक ठरणार

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-



माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात दूध उत्पादन होत असून, दुधामुळे तालुक्यात आर्थिक समृद्धी निर्माण झाली आहे. या व्यवसायात अधिक संशोधन, कमी गाईंमध्ये जास्त दूध उत्पादन, याचबरोबर नवनवीन संकल्पना राबवण्यासाठी राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह देशमुख यांच्या पुढाकारातून महाराष्ट्र व पंजाब या दोन राज्यांमधील प्रोग्रेसिव्ह डेअरी फार्मर असोसिएशन मध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे.

वसंत लॉन्स येथे संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाच्या वतीने मिशन ५० लिटर दुग्ध क्रांती पुन्हा एकदा या तालुक्यातील १५०० युवक दूध उत्पादकांच्या कार्यशाळेत हा सामंजस्य करार महाराष्ट्राचे मा. महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीमध्ये राजहंस दूध संघ व महाराष्ट्र प्रोग्रेसिव्ह डेअरी फार्मर असोसिएशनचे अध्यक्ष रणजीतसिंह देशमुख आणि पंजाब प्रोग्रेसिव्ह डेअरी फार्मर असोसिएशनचे अध्यक्ष दलजीतसिंग गिल यांच्यामध्ये स्वाक्षरी करार झाला. याप्रसंगी संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात, पंजाबचे पीडीएफएचे खजिनदार राजपालसिंग, सुखदेवसिंग, दूध संघाचे व्हा. चेअरमन राजेंद्र चकोरयांच्यासह विविध व्हेटर्नरी डॉक्टर, त्याचप्रमाणे तालुक्यातील युवक दूध उत्पादक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणात असल्याने, या व्यवसायात रणजीतसिंह देशमुख यांच्या नेतृत्वात तालुक्यात एमडीएफ गोठा, मुरघास या संकल्पना राबवल्या गेल्या. यापुढील काळात कमी गाईंमध्ये जास्त उत्पादन यासाठी मिशन ५० लिटर अभियान राबविण्यात येत असून, या अंतर्गत ५० लिटर दूध देणाऱ्या गाई निर्माण करण्यात येणार आहे. याचबरोबर पंजाब राज्याने दुग्ध क्षेत्रामध्ये केलेली क्रांती ही दिशादर्शक असून, पंजाब आणि महाराष्ट्रात विविध संशोधन, दूध व्यवसायातील कल्पना, माहितीची देवाण-घेवाण, गाईचे आरोग्य व आहार याबाबत अधिक समन्वय राहावा, याकरता महाराष्ट्र प्रोग्रेसिव्ह डेअरी फार्मर्स असोसिएशनचे अध्यक्ष रणजीतसिंह देशमुख यांच्या पुढाकारातून पंजाब बरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना पंजाब मध्ये होणाऱ्या नवनवीन प्रयोगांची माहिती सहज उपलब्ध होणार आहे. याचबरोबर अनेक शेतकऱ्यांना पंजाब मधील शेतकऱ्यांच्या गाई गोठ्यांवर जाऊन तेथील कामाची पाहणी करता येणार आहे. याचबरोबर पंजाबच्या शेतकऱ्यांचे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन मिळणार आहे.

पंजाबचे दलजीत सिंह म्हणाले की, संगमनेर तालुक्याने राज्याला दिशा दिली आहे. मिशन ५० लिटर या उपक्रमातून दूध उत्पादन वाढीमध्ये दुसरी क्रांती होणार असून, संगमनेरचा हा पॅटर्न संपूर्ण राज्यासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी महाराष्ट्र व पंजाब यांच्या वतीने सामंजस्य करारावर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ................ 05
सेल्सगर्ल................ 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर..................... 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# महायुतीच्या शास्ती माफीच्या निर्णयामुळे कर वसुलीला प्रतिसाद - साक्षी सूर्यवंशी

## कराचा निधी पायाभूत सुविधांसाठी वापरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

राज्यातील महायुती सरकारने ५० टक्के शास्ती माफीसाठी महत्वपूर्ण ऐतिहासिक 'अभय योजना' लागू केली. यासाठी आ. अमोल खताळ यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आणि शासन दरबारी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. या पाठपुराव्यामुळेच शहरातील नागरीकांना मोठा फायदा होत आहे. तसेच संगमनेर नगरपालिकेला कर वसुलीच्या माध्यमातून शहर विकासासाठी मोठा निधी उपलब्ध होत आहे. पालिका प्रशासनाकडून या निधीचा उपयोग पायाभूत सुविधांसाठी करण्यात यावा अशी अपेक्षा शिवसेना नगरसेविका सौ. साक्षी सूर्यवंशी यांनी व्यक्त केली.

अर्थिक वर्ष अखेरीस कर वसुलीसाठी नागरीकांनी केलेले सहकार्य विचारात घेता महायुती सरकाने घेतलेल्या शास्ती माफीचा सकारात्मक परिणाम असल्याचे सांगून नगरसेविका सौ. सूर्यवंशी म्हणाल्या की, आ. अमोल खताळ यांनी नागरीकांना शास्ती माफीचा लाभ मिळावा म्हणून राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांची व्यक्तिगत भेट देवून शास्ती माफीचा निर्णय लागू व्हावा म्हणून विशेष प्रयत्न केले. यामुळे वर्षानुवर्ष नागरीकांवर असलेला कराचा बोजा कमी झाला. पालिका प्रशासनाला वसुलीस नागरिकांनी मोठे सहकार्य केल्याचे नगरसेविका सौ. सूर्यवंशी यांनी सांगितले.

पालिकेच्या तिजोरीत कराच्या रूपाने जमा झालेला निधी विकास कामासाठी असून पालिका प्रशासनाने यामाध्यामतून शहरातील पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्याची मागणी सौ.सूर्यवंशी यांनी केली आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आ. अमोल खताळ यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासाला निधीची उपलब्धता होत आहे. शहराच्या विकासात महायुती कुठेही कमी पडणार नाही आशी ग्वाही देवून नागरीकांच्या हक्कासाठी व न्यायासाठी महायुती म्हणून पालिकेत सक्रीयपणे भूमिका बजावणार असल्याचेही यांनी सौ.सूर्यवंशी सांगितले.

# अवैध गॅस रिफिलिंग सेंटरवर पोलिसांचा छापा

## दोघे ताब्यात, ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी):

संगमनेर - जागतिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस टंचाईचे संकट गडद होत असताना, संगमनेर शहरात अवैध गॅस रिफिलिंगचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शहर पोलिसांनी घुलेवाडी येथील एका गॅरेजवर छापा टाकून दोन परप्रांतीयांना रंगेहात पकडत सुमारे ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घुलेवाडी येथील मॅजिक मोटर्स कार स्कॅनिंग अँड रिपेरिंग सेंटर येथे अवैध गॅस रिफिलिंग सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार बुधवारी (दि. १ एप्रिल) दुपारी पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईदरम्यान केतन चतुर रय्यानी (रा. राजकोट, गुजरात; सध्या मुक्काम घुलेवाडी, संगमनेर) व आवडा भिकू बोरसेरा (रा. पोरबंदर, गुजरात) या दोघांना अवैधरित्या गॅस रिफिलिंग करताना रंगेहात पकडण्यात आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून ९ हजार रुपये किमतीची एक व्यावसायिक गॅस टाकी, १५ हजार रुपये किमतीच्या तीन घरगुती गॅस टाक्या, १ हजार रुपये किमतीचे गॅस रिफिलिंग किट तसेच ३० हजार रुपये किमतीची एक दुचाकी असा एकूण ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल राहुल धांडे यांच्या फिर्यादीवरून शहर पोलिस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल बाबा सातपुते करत आहेत. दरम्यान, गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर अशा अवैध प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी कारवाई तीव्र करण्याचे संकेत दिले असून, नागरिकांनीही संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# संगमनेर पालिकेची विक्रमी वसुली

## शास्ती माफीला उत्स्फुर्त प्रतिसाद



युवावार्ता (प्रतिनिधीः

संगमनेर - संगमनेर नगर पालिकेने राबविलेल्या वसुली मोहीमेला संगमनेरकरांनी उत्तम प्रतिसाद दिला. यंदा मालमत्ता व पाणी पट्टी कर वसुलीत मागील वर्षापेक्षा तब्बल ३ कोटी रुपये वाढ झाली आहे. एकुण १८ कोटी रुपये कर वसूल झाला, अशी माहिती मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी दिली.

संगमनेर नगरपालिका नागरिकांना विविध सुविधा पुरवत आहे. यामुळे पाणीपट्टी व मालमत्ता कर वसुलीसाठी पालिका अधिकारी- कर्मचारी पाठपुरावा करतात. शासनाने मालमत्ता कराच्या शास्तीत ५० टक्के कपात केली. यामुळे नागरिकांनी थकीत कर रक्कम तत्काळ भरावी, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा इशारा पालिकेने दिला

होता. जानेवारी फेब्रुवारी महिन्यात पालिका अधिकारी कर्मचाऱ्यांनी शहरातील दुकानदार, व्यापाऱ्यांसह घरोघरी जाऊन, कर वसुलीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. या मोहिमेला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. मागील २०२४-२५ या आर्थिक वर्षात ११ कोटी ३९ लाख रुपये मालमत्ता तर, ३ कोटी ६३ लाख रुपये पाणीपट्टी कर वसुली केली. एकूण १५ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. चालू २०२५-२६ या आर्थिक वर्षात मालमत्ता कर १३ कोटी ४७ लाख रुपये तर, पाणीपट्टी कर ४ कोटी ४५ लाख रुपये, अशी एकूण १८ कोटी रुपये कर वसुली केली आहे. मागिल वर्षीपेक्षा यंदा कर वसुलीत ३ कोटी रुपये वाढ झाली आहे.

पालिकेला यंदा २७ कोटी वसुली करण्याचे उद्दिष्ट दिले होते. नागरिक नव्या कराचा भरणा करतात, मात्र कोरोना काळातील थकबाकी वसुलीसाठी पालिकेचा पाठपुरावा सुरू होता. दुकानदार, हॉस्पिटल, बँकांसह व्यावसायिक थकबाकीला अधिक महत्त्व दिले होते. आता मालमत्ता कर शास्तीत ५० टक्के कपात होणार नाही. पालिकेने कर वसुलीत यंदा पाठ पुरावा केल्यामुळे वसुलीत वाढ झाली आहे.

'संगमनेर पालिकेने मालमत्ता करावरील शास्तीत ५० टक्के कपात केली. संगमनेरकरांनी वसुली माहिमेस चांगला प्रतिसाद दिला. चालु कर भरणा नागरिक करतात, मात्र कोरोना काळातील थकबाकी वसुलीसाठी पाठपुरावा करावा लागला. यंदा एकुण १८ कोटी रुपये मालमत्ता व पाणीपट्टी कर वसूल केला. मागील वषपिक्षा यंदा कर वसुलीमध्ये ३ कोटी रुपये वाढ झाली आहे. अशी माहिती दयानंद गोरे, नगरपालिका मुख्याधिकारी यांनी दिली.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# ओझर खुर्दमध्ये महिलांचा ग्रामपंचायतवर हंडा मोर्चा

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - वीज बिल न भरल्यामुळे संगमनेर तालुक्यातील ओझर खुर्द गावातील पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीचा वीज पुरवठा महावितरणने खंडित केला होता. परिणामी, ग्रामस्थांना पाणी मिळत नसल्याने सोमवारी (३० मार्च) महिलांनी आक्रमक पवित्रा घेत ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा काढला.

ओझर खुर्द ग्रामस्थांनी नियमित पाणीपट्टी भरूनही त्यांना पाणी मिळत नाही असा दावा आंदोलक महिलांनी केला. विहिरीवरील वीज पुरवठा तोडल्याने गेल्या काही दिवसांपासून नळाला पाणी आलेले नाही. याबाबत सरपंच गिरिजा साबळे, उपसरपंच दगडू शेपाळ आणि ग्रामसेविका ज्योती विधाटे यांच्याकडे वारंवार तक्रार करूनही केवळ उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचा गंभीर आरोप आंदोलक महिलांनी केला. पाणी नसल्याने गावातील महिलांना उन्हातान्हात गावाबाहेरील सरकारी विहिरीवरून पाणी आणावे लागत आहे. त्यामुळे कामावर जाणाऱ्या महिलांची रोजंदारी बुडत असून त्यांचा संपूर्ण दिवस केवळ पाणी भरण्यातच जात आहे. मूलभूत सुविधेसाठी एवढी कसरत करावी लागणे, हे ग्रामपंचायतीचे मोठे अपयश असल्याची प्रतिक्रिया या महिलांनी दिली. दरम्यान, सोमवारी सकाळी महिलांनी रिकामे हंडे घेऊन ग्रामपंचायत कार्यालयावर धडक दिली. यावेळी महिलांनी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना जाब विचारला असता आंदोलक आणि पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक उडाली, त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. वेळीच घटनास्थळी पोलीस दाखल झाल्यानंतर हा तणाव निवळला.

सरपंच गिरीजा साबळे म्हणाल्या की, पाणीपट्टीची वसुली कमी झाल्यामुळे महावितरणचे वीज बिल भरण्यास विलंब झाला. परिणामी, शुक्रवारी वीज पुरवठा खंडित झाला होता. शनिवारी कोरडा दिवस पाळला जातो आणि रविवारी सुट्टी होती, यामुळे एक-दोन दिवस पाणीपुरवठा करता आला नाही. मात्र, तातडीने थकीत बिलाचा भरणा केला असून मंगळवारी वीज जोडणी झाल्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग • किडनी विकार
• मधुमेह व हृदयरोग • मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• दमा व श्वसनाचे विकार • सर्पदंश व विषबाधा
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार • बालरोग चिकित्सा विभाग
• जनरल सर्जरी • प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया • संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रुग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) अॉपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25